Page : 
Date : / /

## तटस्थ

तुम्ही आम्ही काठावरून पाण्यात पाय सोडायचे
उडी घेऊन प्रवाहाविरुध्द पाणी कुणी उडवायचे ?


दुरून डोंगर साजरे आपल्या डिक्शनरीतील म्हण
होऊन गीर्यारोहक चढण कुणी चढत रहायचे ?

निळ्या आभाळाचे वेड असते सर्वांना नक्की
आपण नुसते गॅलरीतून पक्षांना उडताना पहायचे

नुसती प्रोत्साहन पूर्तता जाणुन बुजुन कर्तव्यमूढता
आपण कपडेच सांभाळायचे त्वेषाने कुणी लढायचे ?

पाणी उडवावे कुणी ? पर्वतावर चढावे कुणी ?
आकाशी उडावे कुणी ? मैदानी लढावे कुणी ?

शिवबाने घरी सदा दुसऱ्यांच्या जन्मा यायचे
तुम्ही आम्ही फक्त बारशालाच जायचे ?



संग्राहक - नलीनी जोहरे
G-604, वृंदावन हाईट्स.